**<u>नि. फौ. क्रं.२५/२०१७.</u>**
निशाणी नं. ६३

**शपथेवर सुरू,**
नाव— श्री. संपत दत्तु निगडे,
वय ५८ , धंदा— शेती,
रा. कानगाव, ता. दौंड जि. पुणे.

**<u>फिर्यादीचा आरोपीचे वकिल ॲड. श्री. के. डी. गायकवाड यांच्यातर्फे</u>**

**<u>उलटतपास</u>**

लक्ष्मण निगडे व ज्योती निगडे हे माझे मुलगा व सुन आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी कानगाव येथील निगडे वस्तीमध्ये राहतो. मला दोन भाऊ आहेत. आम्ही तिघेही शेजारी—शेजारी राहतो. माझा विवाह दि. २२.०५. १९८७ रोजी झाला. हे म्हणणे खरे आहे की, दि. ३०.०१.२०१७ रोजी मी माझ्या पत्नीला नांदावयास येण्यासाठी नोटिस पाठविली होती. त्यातील मजकुर मी वाचून पाहिला होता. सदर नोटिसीमधील मजकुर बरोबर असून मी सदरची नोटिस न्यायालयामध्ये दाखल करण्यास तयार आहे. सदर नोटिसीस माझ्या पत्नीने उत्तर दिले नव्हते. प्रस्तुतच्या कामातील आरोपी माझा मुलगा याने आमची वडिलोपार्जीत जमिन वाटुन मिळावी याबाबत माझ्याकडे मागणी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर वाटपाबाबत आमच्यामध्ये वाद झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी जमिनीचे वाटप करुन देत नाही म्हणून माझ्या मुलाने दिवाणी कोर्टामध्ये दावा दाखल केला होता. सदर दाव्याबाबत मला कोणतीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर जमिन वाटपाच्या वादावरुन मी चिडून जावून दि. १९/०६/२०१५ रोजी आरोपीला घराबाहेर काढले. हे म्हणणे खरे आहे की, तेव्हापासून आम्ही वेगळे राहतो. त्यानंतर आरोपी होळकरवाडी येथे राहण्यास गेले. होळकरवाडी ही आमच्या घ रापासून एक ते दिड किलो मीटर अंतरावर आहे. होळकर वाडी येथे ५०० ते ६०० घरांची वस्ती आहे. आरोपी हे शिंदे यांच्या घरामध्ये राहण्यास गेले होते.

हे म्हणणे खरे आहे की, शिंदे यांच्या घराशेजारी १० ते १५ लोकांची घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर लोकवस्तीमध्ये शेतमजुर व शेतकरी राहतात त्यामुळे त्यांच्याकडे गाई—म्हशी अशी जनावरे आहेत. उत्तम फडके हे आरोपींच्या शेजारी राहत असल्यामुळे मी त्यांना ओळखतो. उत्तम फडके हे माझ्या भावाचे मेहूने आहेत. हनुमंत निगडे हा माझा पुतन्या असल्यामुळे मी त्याला ओळखतो. आमच्या घरापासून होळकरवाडीकडे जाण्यासाठी कॅनॉलचा कच्चा रस्ता आहे. सदर रस्त्याच्या पूर्वेला आडिच ते तीन फुटाचा कॅनॉल आहे. घटनेदिवशी सकाळी मी आरोपींकडे ७:३० वाजता मोटरसायकलवर गेलो होतो. आरोपीकडे मी माझ्या शेतामध्ये पेरणी करण्यासाठी आावश्यक मक्याच्या बियांची मागणी करण्यासाठी गेलो होतो. सदर बियाणे देण्यासाठी आरोपीने नकार दिल्यामुळे आमच्या दोघांमध्ये बाचाबाची झाली, त्याचा आवाज ऐकून तेथे २० ते २५ लोक जमा झाले. त्यावेळी हनुमंत निगडे व उत्तम फडके यांनी आमचे भांडण सोडवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर तेथील लोक तेथून निघुन गेले. तेव्हा आरोपींनी माझ्या डोक्यात दगड मारला होता त्यानंतर हनुमंत निगडे हे मला पाटस पोलिस स्टेशनला घेवून गेले. तेव्हा मी तेथे माझ्या हस्ताक्षरामध्ये लेखी तक्रार दिली. हे म्हणणे खरे आहे की, मी सदरची लेखी तक्रार प्रस्तुतचे कामी न्यायालयात दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलिस स्टेशनला जाण्यापूर्वी मी डॉ. दिवेकर यांच्या खाजगी दवाखान्यात गेलो होतो. आम्ही पोलिस स्टेशनला गेलो तेव्हा पोलिसांनी आम्हाला यवत येथील सरकारी हॉस्पीटलमध्ये जाण्यास सांगितले. त्यानंतर माझा लहान मुलगा शरद व मी मोटार सायकलवर सकाळी १०:३० च्या सुमारास यवत हॉस्पीटलला गेलो. हे म्हणणे खरे आहे की, डॉक्टरांनी मला तपासून सर्टिफिकेट दिले व ते मी पाटस पोलिस स्टेशनला जमा केले. हे म्हणणे खरे नाही की, माझे व आरोपीचे जमिन वाटपावरुन वाद असल्यामुळे मी सदरची खोटी केस आरोपींविरुध्द केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला मारहाण केली नाही अथवा शिवीगाळ व दमदाटी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी मोटरसायकलवरुन जात

असताना घसरुन पडल्यामुळ माझ्या डोक्याला दुखापत झाली व त्याचा फायदा घेवून मी आरोपीविरुध्द खोटी केस दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृती,

ठिकाण : दौंड

दि. २३/०१/२०२०.

**( श्रीमती ए. ए. लगारे )**

३ रे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दौंड,

ता. दौंड, जि.पुणे.